पुढारी

# ‘एनएसएस’कडून पूरग्रस्त गावांत १ सप्टेंबरपर्यंत स्वच्छता मोहीम

## सातारा जिल्ह्यातील १३ महाविद्यालयांचे ६५० स्वयंसेवक सहभागी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी शहरातील पूरस्थिती ओसरल्यापासून शहरात महानगरपालिकेतर्फे सुरू असलेल्या स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला आहे. त्यानंतर पूरग्रस्त गावांमध्ये स्वच्छता मोहिमेसह समुपदेशन, सर्वेक्षण कामांमध्ये सहभाग घेण्यात येणार आहे. १ सप्टेंबरपर्यंत मोहीम चालणार असून सातारा जिल्ह्यातील एनएसएसचे सुमारे ६५० स्वयंसेवक व २५ कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले आहेत.

विद्यापीठातील मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर प्र-कुलगुरू डॉ. शिर्के व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते पूरग्रस्त गावांकडे निघालेल्या ‘एनएसएस’ स्वयंसेवकांना किटचे वाटप करण्यात आले. स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकाऱ्यांनी



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ एनएसएसच्या वतीने पूरग्रस्त गावांत स्वच्छता मोहीम सुरू करण्यात आली आहे. मोहिमेसाठी सातारा जिल्ह्यातून दाखल झालेल्या स्वयंसेवकांसमवेत प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. के. गायकवाड आदी.**

पूरग्रस्त गावांमध्ये सेवाभावी पद्धतीने काम करावे, असे आवाहन प्र-कुलगुरू यांनी यावेळी केले.

विद्यापीठाने कोल्हापूर जिल्ह्यातील औरवाड, अर्जुनवाड, कवठेगुलंद, गणेशवाडी, बुबनाळ, शेडबाळ, अब्दुललाट, टाकवडे, नृसिंहवाडी, खिद्रापूर आणि कुरुंदवाड ही पूरग्रस्त गावे स्वच्छता, सर्वेक्षण व समुपदेशनासाठी दत्तक घेतली आहेत. तेथे ग्रामस्वच्छता, शाळांसह शासकीय इमारतींची स्वच्छता, मदत वाटप आदी कामे १ सप्टेंबरपर्यंत करण्यात येणार आहेत. जिल्हा प्रशासनाने स्वयंसेवकांची ने-आण करण्यासाठी सहा एसटी बसेसचीही सोय केली आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रभारी समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांनी दिली.

“

कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी व समन्वयकांच्या बैठका घेऊन पूरग्रस्त भागात स्वच्छता मोहिमा व शिबिरे घेण्याचे ठरविले. त्यानुसार तीनही जिल्ह्यांत विविध महाविद्यालयांचे पथक पूरग्रस्त भागात, गावांत मोहिमा राबवीत आहेत. पूरग्रस्तांना मदतीचा हात देऊन दिलासा देण्याचे काम विद्यापीठ प्रशासन करीत आहे.

**- डॉ. देवानंद शिंदे,** कुलगुरू

# पूरग्रस्त गावांत १ सप्टेंबरपर्यंत स्वच्छतेचा जागर

## विद्यापीठाचा उपक्रम : सातारा जिल्ह्यातील १३ महाविद्यालयांचे ६५० स्वयंसेवक सहभागी

कोल्हापूर / प्रतिनिधी :
शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांतर्फे पूरग्रस्त गावांमध्ये स्वच्छता मोहिमेसह समुपदेशन, सर्वेक्षण असा उपक्रम राबविण्यात येत आहे. १ सप्टेंबरपर्यंत ही मोहीम चालणार असून यामध्ये शिवाजी विद्यापीठाचे सातारा जिल्ह्यातील एनएसएसचे सुमारे ६५० स्वयंसेवक आणि २५ कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले आहेत. त्या सर्वांनी पूरग्रस्त गावांमध्ये सेवाभावी पद्धतीने काम करावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

प्र-कुलगुरू डॉ. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते पूरग्रस्त गावांकडे निघालेल्या एनएसएस स्वयंसेवकांना किट वाटप करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

शिवाजी विद्यापीठाने कोल्हापूर जिल्ह्यातील औरवाड, अर्जुनवाड, कवठेगुलंद, गणेशवाडी, बुबनाळ, शेडबाळ, अब्दुललाट, टाकवडे, नृसिंहवाडी, खिद्रापूर आणि कुरुंदवाड ही पूरग्रस्त गावे स्वच्छता, सर्वेक्षण आणि समुपदेशनासाठी दत्तक घेतली आहेत. तेथे ग्रामस्वच्छता, शाळांसह शासकीय इमारतींची स्वच्छता, मदत वाटप आणि अन्य अनुषंगिक कामे करण्यात येणार आहेत.

रविवार, दि. १ सप्टेंबरपर्यंत ही कामे करण्यात येणार आहेत. सर्वेक्षणासह पूरबाधित ग्रामस्थांचे समुपदेशन करून आपत्तीच्या धक्क्यातून त्यांना सावरण्याचे कामही करण्यात येणार आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासनासह रोटरी व इनरव्हील क्लब, कोल्हापूर यांनीही सहकार्याचा हात पुढे केला आहे. वुई केअर या संस्थेने एनएसएस स्वयंसेवकांना गमबूट, मास्क, हातमोजे, औषधांचे किट आदी साहित्य उपलब्ध करून दिले आहे. जिल्हा प्रशासनाने स्वयंसेवकांची ने-आण करण्यासाठी सहा बसेसचीही सोय केली आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रभारी समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांनी दिली.

या मोहिमेत सातारा जिल्ह्यातील १३ महाविद्यालयांतील प्रत्येकी ५० एनएसएस स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. या महाविद्यालयात एस. बी. एम. महाविद्यालय (रहिमतपूर), वाय. सी. महाविद्यालय (कराड), डी. जी. महाविद्यालय (सातारा), म. ह. शिंदे महाविद्यालय (मेढा), मुधोजी महाविद्यालय (फलटण), एन. एस. बी. महाविद्यालय (फलटण), एस. पी. महाविद्यालय (लोणंद), एस. आर. एम. महाविद्यालय (खटाव), कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय (पाचवड), कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय (सातारा), एस. जे. कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय (वाघोली), कला, वाणिज्य महाविद्यालय (वाठार स्टेशन), पी. एस. कदम कला, वाणिज्य महाविद्यालय (देऊर).



कोल्हापूर : पूरग्रस्त गावात मंगळवारपासून स्वच्छता मोहीम राबवण्यास सुरुवात झाली. त्यासाठी सातारा जिल्ह्यातून आलेल्या स्वयंसेवकांसमवेत प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर आदी.

### तिन्ही जिल्ह्यांत मोहिमा

शिवाजी विद्यापीठाने कोल्हापूर, सांगली व सातारा या तिन्ही जिल्ह्यांतील महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी व समन्वयकांच्या बैठका घेऊन पूरग्रस्त भागांत स्वच्छता मोहीम व शिबिरे घेण्याचे ठरवले. त्यानुसार कोल्हापूरसह सांगली व सातारा जिल्ह्यांतही विविध महाविद्यालयांचे चमू आपल्या शेजारच्या पूरग्रस्त विभागात, गावांत अशा प्रकारच्या मोहिमा राबविण्यात येत आहेत. एनएसएसच्या स्वयंसेवकांच्या माध्यमातून पूरग्रस्तांना मदतीचा हात देऊन दिलासा देण्याचे काम विद्यापीठ प्रशासन करत आहे.

– डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू

लोकमत

# पदवी, पदविका प्रमाणपत्रासाठी करा अर्ज

## शिवाजी विद्यापीठ : ऑनलाईन प्रक्रिया

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ५६ या दीक्षान्त समारंभ डिसेंबर २०१९ ते जानेवारी २०२० या कालावधीत नियोजित आहे. ऑक्टोबर २०१८, एप्रिल २०१९ सत्रातील आणि यापूर्वीच्या अंतिम परीक्षांमध्ये उत्तीर्ण, पात्र विद्यार्थ्यांनी पदवी, पदविका प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी विहित नमुन्यामध्ये ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. नियमित शुल्कासह अर्ज करण्याची प्रक्रिया सोमवार (दि. २६ ऑगस्ट) पासून सुरु झाली असून, तिची मुदत दि. २७ सप्टेंबरपर्यंत आहे.

ऑनलाईन अर्जाची प्रिंट योग्य त्या कागदपत्रांसह विद्यापीठाच्या दीक्षान्त विभागामध्ये सादर करण्याची अंतिम तारीख दि. ३० नोव्हेंबर आहे. पदवी प्रमाणपत्र मागणीचा अर्ज विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन भरून त्याची प्रिंट घ्यावयाची आहे. ज्या परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत, अशा परीक्षांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ठेवण्यात आली आहे. त्या परीक्षांच्या पदवी प्रमाणपत्र मागणी अर्जांबाबत ऑनलाईन प्रक्रिया होईल. प्रमाणपत्र मिळविण्यासाठी विलंब शुल्कासहित अर्ज करण्याची मुदत दि. २८ सप्टेंबर ते १९ ऑक्टोबर, अतिविलंब शुल्कासह अर्ज करण्याची मुदत दि. २० ऑक्टोबर ते दि. ८ नोव्हेंबर या कालावधीत होणार आहे. पीएच. डी.प्राप्त विद्यार्थ्यांचे दीक्षान्त अर्ज हे शुल्कासहित दि. ३० नोव्हेंबरपर्यंत स्वीकारले जाणार आहेत.

### आवश्यक कागदपत्रे

अर्जासोबत आयडेंटिटी साईज एक फोटो, अंतिम वर्षाचा गुणतक्ता आणि भाग दोनमधील पर्यावरणशास्त्र विषयाचा उत्तीर्ण गुणतक्ता जोडणे आवश्यक आहे. अपुऱ्या अर्जाची दखल घेतली जाणार नाही. त्याबाबत पत्रव्यवहार करण्यात येणार नाही, अशी माहिती पळसे यांनी दिली.

# एनएसएस करणार पूरग्रस्तांचे समुपदेशन

## स्वयंसेवकांसह अधिकाऱ्यांचा सहभाग

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे पूरग्रस्त गावांमध्ये स्वच्छता मोहिमेसह समुपदेशन, सर्वेक्षण मोहीम राबवण्यात येणार आहे. १ सप्टेंबरपर्यंत ही मोहीम चालणार असून यामध्ये शिवाजी विद्यापीठाचे सातारा जिल्ह्यातील एनएसएसचे सुमारे ६५० स्वयंसेवक आणि २५ कार्यक्रम अधिकारी सहभागी होत आहेत. मंगळवारी प्र-कुलगुरू डॉ. शिर्के आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते पूरग्रस्त गावांकडे निघालेल्या एनएसएस स्वयंसेवकांना कीट वाटप करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाने कोल्हापूर जिल्ह्यातील औरवाड, अर्जुनवाड, कवठेगुलंद, गणेशवाडी, बुबनाळ, शेडबाळ, अब्दुललाट, टाकवडे, नृसिंहवाडी, खिद्रापूर आणि कुरुंदवाड ही पूरग्रस्त गावे स्वच्छता, सर्वेक्षण आणि समुपदेशनासाठी दत्तक घेतली आहेत. तेथे ग्रामस्वच्छता, शाळांसह शासकीय इमारतींची स्वच्छता, मदत वाटप आणि अन्य अनुषंगिक कामे करण्यात येणार आहेत. १ सप्टेंबरपर्यंत ही कामे करण्यात येणार आहेत. सर्वेक्षणासह पूरबाधित ग्रामस्थांचे समुपदेशन करून आपत्तीच्या धक्क्यातून त्यांना सावरण्याचे कामही करण्यात येणार आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासनासह रोटरी व इनरव्हील क्लब, कोल्हापूर यांनीही सहकार्याचा हात पुढे केला आहे. वुई-केअर या संस्थेने एनएसएस स्वयंसेवकांना गमबूट, मास्क, हातमोजे, औषधांचे कीट आदी साहित्य उपलब्ध करून दिले आहे. जिल्हा प्रशासनाने स्वयंसेवकांची ने-आण करण्यासाठी सहा एसटी बसेसचीही सोय केली आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रभारी समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड यांनी यावेळी दिली.



स्वयंसेवकांसमवेत विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, एनएसएसचे समन्वयक डॉ. डी.के. गायकवाड आदी.

या मोहिमेत सातारा जिल्ह्यातील १३ महाविद्यालयांतील प्रत्येकी ५० एनएसएस स्वयंसेवक सहभागी झाले आहेत. यामध्ये साताऱ्यातील एस.बी. एम. महाविद्यालय, (रहिमतपूर), वाय. सी. महाविद्यालय, (कराड), डी.जी. महाविद्यालय, (सातारा), म.ह. शिंदे महाविद्यालय, (मेढा), मुधोजी महाविद्यालय, (फलटण), एन.एस. बी. महाविद्यालय, (फलटण), एस.पी. महाविद्यालय, (लोणंद), एस.आर.एम. महाविद्यालय, (खटाव), कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय, (पाचवड), कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय, (सातारा), एस.जे. कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, (वाघोली), कला वाणिज्य महाविद्यालय, (वाठार स्टेशन), पी.एस. कदम कला वाणिज्य महाविद्यालय, (देऊर) या महाविद्यालयांचा समावेश आहे.

> 'कोल्हापूर, सांगली व सातारा या तीनही जिल्ह्यांतील महाविद्यालयांच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी व समन्वयकांच्या बैठका घेऊन पूरग्रस्त भागांमध्ये स्वच्छता मोहिमा व शिबिरे घेण्याचे ठरविण्यात आले आहे. त्यानुसार कोल्हापूरसह सांगली व सातारा जिल्ह्यांतही विविध महाविद्यालयांचे टीम आपल्या शेजारच्या पूरग्रस्त विभागात, गावांत अशा प्रकारच्या मोहिमा राबवित आहेत
>
> – डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

# नाइट कॉलेजमध्ये 'मोडी लिपी' कोर्स

कोल्हापूर : मोडी लिपीचे प्रशिक्षण देण्यासाठी नाइट कॉलेज ऑफ आर्टस् अॅण्ड कॉमर्सच्या मराठी विभागाच्या वतीने 'मोडीलिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम' ५ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर २०१९ या एक महिन्याच्या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे.

आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर मान्यताप्राप्त या कोर्समध्ये मोडीलिपीचे वाचन व लेखन यांचे संपूर्ण प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाणार आहे. नाइट कॉलेजमध्ये सायंकाळी ६ ते ८ या वेळेत कोर्स होणार आहे. प्रवेशासाठी इयत्ता १० वी उत्तीर्ण असावे. इच्छुकांनी मराठी विभागप्रमुख डॉ. अरुण शिंदे (मो. ९४२१०२४०५५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. एस.जे.फ राकटे यांनी केले आहे.

१९६० पूर्वी गेल्या पाचशे वर्षांतील महाराष्ट्रातील प्रशासकीय व्यवहाराची भाषा मोडी होती. त्यामुळे महसूल विभागासह सर्व कागदपत्रे मोडीलिपीत आढळतात. मोडी कागदपत्रांचे भंडार महाराष्ट्रभर पसरलेले आहे. सरकारी- निमसरकारी कामांसाठी, जातीच्या दाखल्यांसाठी, न्यायालयीन कामकाजासाठी महसूल कागदपत्रांसाठी तसेच संशोधनासाठी मोडी कागदपत्रे वाचणाऱ्या तज्ज्ञांची अत्यंत आवश्यकता आहे.

मोडी शिकल्यानंतर मोडी कागदपत्रांचे भाषांतर करून करिअर व स्वयंरोजगाराच्या तसेच सरकारी-निमसरकारी पातळीवर नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत.

# शिवाजी विद्यापीठात पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी प्रवेश सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात विदेशी भाषा विभागात ३० ऑगस्टपासून पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रमास प्रारंभ होणार असून, त्यासाठीचे प्रवेश सुरू झाले आहेत. 'पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम' हा एक वर्ष कालावधीचा असून, भविष्यात पोर्तुगीज दूतावास सांस्कृतिक केंद्र, गोवा या संस्थेशी सामंजस्य कराराची प्रक्रिया सुरु आहे. त्याचा विद्यार्थांना फायदा होणार आहे. अधिक माहितीसाठी विदेशी भाषा विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.

# विद्यापीठात पोर्तुगीज भाषा अभ्यासक्रम

**उजळाईवाडी :** शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागात ३० ऑगस्टपासून एक वर्ष कालावधीचा पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू होणार आहे. त्याचे प्रवेश सुरू असून प्रवेश व अधिक माहितीसाठी इच्छुकांनी तत्काळ संपर्क साधावा, असे आवाहन विदेशी भाषा विभागाने केले आहे. पोर्तुगीज ही जगात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या मातृभाषांत सहाव्या क्रमांकाची भाषा आहे. युरोप, आफ्रिका, दक्षिण अमेरिका व आशिया खंडात आठ देशांत पोर्तुगीज ही अधिकृत भाषा आहे. जगातील अनेक देशांतील शाळांत ती शिकवली जाते. दिल्ली, मुंबई, पुणे, बंगळूर, हैदराबाद, चेन्नई अशा महानगरी शहरांत बहुराष्ट्रीय कंपन्यांना पोर्तुगीज भाषा तज्ज्ञांची मोठी गरज आहे. पोर्तुगीज भाषेचे ज्ञान इतिहास संशोधक व अनुवादकांसाठीही करिअरच्या अनेक संधी आहेत. पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम हा एक वर्ष कालावधीचा असून दर शुक्रवार व शनिवारी सायंकाळी त्याचे तास होणार आहेत. भविष्यात पोर्तुगीज दूतावास सांस्कृतिक केंद्र, गोवा या संस्थेशी सामंजस्य करार होण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# मोडी लिपी वर्गाचे आयोजन

कोल्हापूर : नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्सच्या मराठी विभागातर्फे मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम ५ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर दरम्यान होत आहे. शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग मान्यताप्राप्त या अभ्यासक्रमात मोडी लिपीचे वाचन व लेखन यांचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाणार आहे. सायंकाळी सहा ते आठ या वेळेत प्रशिक्षण दिले जाईल. प्रवेशासाठी इयत्ता दहावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. इच्छुकांनी मराठी विभागप्रमुख डॉ. अरुण शिंदे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. एस. जे. फराकटे यांनी केले आहे.

# पोर्तुगीज भाषा अभ्यासक्रमासाठी प्रवेश

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात विदेशी भाषा विभागात शुक्रवारी (दि. ३०) पासून  एक वर्ष कालावधीचा 'पोर्तुगीज भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम' सुरु होत आहे. त्यासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. पोर्तुगीज ही जगात सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या मातृभाषांत सहाव्या क्रमांकाची भाषा आहे. ती इंग्रजीच्या जवळची असल्याने शिकायला सोपी आहे. पोर्तुगीज भाषेचा अभ्यासक्रम हा एक वर्ष कालावधीचा असून, दर शुक्रवारी आणि शनिवारी सायंकाळी तिचे तास होणार आहेत. प्रवेशासह अधिक माहितीसाठी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागात संपर्क साधावा, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.